भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/११/२०१६

१) अज्ञात वाहन चालकांच्या लापरवीने पायी जाणा-या इसमाचा मृत्यु . :-

दिनांक २२/११/२०१६ रोजी ०५.४५ वा. दर. यातील मृतक फुलदास विठ्ठल धुर्वे वय ७० वर्ष, रा. काळजेश्वर हा संडास साठी बॉटल घेवुन जात असता आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवीने चालवुन मृतकास उडान पुल जवळील पटेल आईल्स दुकान समोर सेंदुरवाफा येथे धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत होऊन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी प्रताप पर्वत धुर्वे वय २५ वर्ष, रा. काजडेश्वर ता. कारंजा जि. वाशिम ह. मु. आदर्शनगर सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गावंडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

२) एसटी वाहन चालकांच्या निष्काळजीपनामुळे ऊभ्या स्कुटीला धडक देवुन गंभिर जखमी केले व स्कुटीची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक १८/११/२०१६ रोजी १२.४५ वा. दर. यातील स्कुटी क्र. एमएच ३६ सी ५१४३ चा चालक हा एसटी बस स्थानक परिसरात ऊभा असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील बस हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन स्कुटी स्वारास येथे धडक देवुन स्कुटी स्वार मधुकर फुलबांधे याचे उजवे पायाचे पंज्याचे वरची चमडी निघुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व स्कुटीची नुकसान केल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १३४(अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

३) मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकास धडक देवुन गंभिर दुखापत झाल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २०/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवीने व निष्काळजीपणे चालवुन जखमी मधुकर हरिराम बडवाईक वय ५० वर्ष, रा. चिचोली हा जांम बसस्टॉप पासुन १०० ते १५० फुट अंतरावर हातात डब्बा घेवुन डांबरी रोडने डावे बाजुने पायी जात असता त्यास मागेहुन धडक देवुन गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. केने पो.स्टे आंधळगाव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक २२/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ५५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता